

मावळातील दळणवळण होणार सुलभ; उद्योग, पर्यटनाला चालना

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in रविवार दिनांक 30/11/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 5 || अंक 282 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# पुणे-मुंबई मार्गावर भरधाव कारला आग

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड : पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर भरधाव कारने अचानक पेट घेतल्याची घटना दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास अमृतांजन पुलाजवळ घडली. सुदैवाने कारमधील सर्व प्रवासी सुखरूप आहेत.**



अचानक कारमधून धूर निघू लागल्याने चालकाने वाहन महामार्गाच्या बाजूला घेऊन थांबवले. स्थितीचा अंदाज घेत प्रवाशांनी तत्काळ कारच्या बाहेर पडत जीव वाचवला. त्यानंतर काही क्षणांतच कारने पूर्णपणे पेट घेतला. काही वाहनचालक मात्र कार जवळून धोकादायक रीतीने प्रवास करत असल्याचे पाहायला मिळाले. घटनेत कार जळून खाक झाली आहे.हेही वाचाजुन्या पुणे-मुंबई महामार्गावर सकाळपासून दोन अपघात; दोन जण जखमी; दोन्ही अपघातांमध्ये कार पलटीघटनेची माहिती मिळताच आयआरबीच्या अग्निशमन दलाने तातडीने धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवले.

या घटनेमुळे द्रुतगती मार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. घटनास्थळी बोरघाट महामार्ग पोलीस दाखल झाले होते. पोलिसांनी वाहतूक सुरळीत केली.

अद्याप आगीचे नेमके कारण समोर आलेले नाही.

# दीड वर्षाच्या मुलाची 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स' मध्ये नोंद

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : दीड वर्षाच्या नील निखिल भालेरावने 2 मिनिट 53 सेकंदात जगातील सुमारे 45 कार ब्रँडची ओळख देत 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स' मध्ये नोंद केली आहे. नील भालेरावने केलेला विक्रम हा केवळ आकड्यांपुरता मर्यादित न राहता भविष्यातील त्याच्या आणखीन प्रयत्नांकडे लक्ष वेधणारा आहे.**

लहान वयात मोठ्या प्रमाणावर स्मरणशक्तीद्वारे नावे लक्षात ठेवत त्याला आत्मविश्वासाने सादर करणे ही बाब उल्लेखनीय असल्याने त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद होणे ही प्रत्येकासाठी अभिमानाची बाब आहे.पण एवढ्या लहान वयात नोंद झाली असून त्याचं महत्व अधिकच आहे. या यशामागे नीलच्या जिद्दीबरोबरच त्याचे पालक आई प्रेरणा भालेराव आणि वडील निखिल भालेराव यांचे मार्गदर्शन, सयंम आणि प्रोत्साहन ही महत्त्वाचे ठरले आहे.

एवढ्या लहान मुलांमधील गुण ओळखून योग्य दिशेने प्रोत्साहन दिल्यास ते मोठ्या उंचीवर पोहोचू शकतात.नीलच्या या यशामुळे महाराष्ट्रासह देशाचे नाव उंचावले आहे.



# पिंपरी चिंचवड वैभव काव्यसंग्रहाचे प्रकाशन बुधवारी

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी, पुणे: महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड शाखा आणि मराठी भाषा संवर्धन समिती पिंपरी चिंचवड यांच्या वतीने "पिंपरी चिंचवड वैभव" काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा बुधवारी (दि.३ डिसेंबर) सायंकाळी पाच वाजता, निगडी प्राधिकरण येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेचे शांता शेळके सभागृह, संत तुकाराम संकुल, (सावली हॉटेल जवळ) येथे आयोजित करण्यात आले आहे,**

**अशी माहिती या काव्य संग्रहाची संकल्पना मांडणारे ज्येष्ठ साहित्यिक संभाजी बारणे यांनी प्रसिद्धीस दिली आहे.**




या काव्यसंग्रहाचे प्रकाशन प्रसिद्ध अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विधानसभेचे उपाध्यक्ष आण्णा बनसोडे, खासदार श्रीरंग बारणे, आमदार शंकर जगताप, पद्मश्री गिरीश प्रभुणे, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाद जोशी, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदचे उपाध्यक्ष भाऊसाहेब भोईर, संस्थेचे अध्यक्ष व संपादक राजन लाखे आदी उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमास मुक्त प्रवेश असून काव्यप्रेमी नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन संभाजी बारणे यांनी केले आहे.

या काव्यसंग्रहात पिंपरी चिंचवड शहरातील प्रमुख स्थळांविषयी जसे की, महासाधू श्री मोरया गोसावी मंदिर, पवित्र इंद्रायणी आणि पवना नदी, भक्ती शक्ती शिल्प, इस्कॉन मंदिर, वैष्णव माता मंदिर, पिंपरी चिंचवड मनपा, पिंपरी चिंचवड प्राधिकरण, उद्योग नगरी, हिंदुस्थान अँटिबायोटिक कंपनी, टाटा मोटर्स, दुर्गा देवी टेकडी, उद्योग नगरी, साहित्य नगरी, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, गुलाब पुष्प उद्यान, बहिणाबाई चौधरी प्राणी संग्रहालय, बर्ड व्हॅली, पिंपरी, चिंचवड, भोसरी गाव, महाराष्ट्र साहित्य परिषद, नाट्य परिषद अशा विविध प्रेक्षणीय व महत्वपूर्ण स्थळांचा गौरव करणाऱ्या कवितांचा समावेश करण्यात आला आहे.

**संभाजी बारणे**



# निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर1600 गुन्हेगारांना नोटिसा

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी-चिंचवड महापालिकेची आगामी निवडणूक शांततेत पार पडावी, यासाठी पोलिसांनी गुन्हेगारांची कुंडली काढण्याचे काम हाती घेतले आहेत. दोनपेक्षा जास्त गुन्हे असलेल्या एक हजार ६०० गुन्हेगारांना प्रतिबंधात्मक नोटिसा देण्याची मोहीम राबविण्यात येत आहे.**




निवडणुकां दरम्यान वातावरण बिघडवू शकणाऱ्या १५९ गुन्हेगारांची 'कुंडली' स्वतंत्ररित्या तयार करण्यात आली आहे.महापालिका निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत. निवडणुकीसाठी प्रशासनाची जोरदार तयारी सुरू आहे. ही निवडणूक शांततेत पार पडावी, यासाठी पोलिसांनीही सूक्ष्म नियोजन सुरू केले आहे. त्यासाठी गुन्हेगारांची माहिती काढली जात आहे.

निवडणुकीपूर्व वातावरण बिघडू नये म्हणून पोलिसांनी तयार केलेल्या १५९ महत्त्वाच्या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींच्या यादीत राजकारणाशी संबंध असलेल्या काही जणांचाही समावेश आहे.

या नेत्यांचा पूर्वीच्या वादात सहभाग, त्यांच्या समर्थकांची गर्दी, निवडणूक काळात तणाव निर्माण होणारा आणि स्थानिक पातळी वरील प्रभाव या सर्व बाबींचा विचार करून त्यांचा समावेश करण्यात आला आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

रविवार दिनांक 30/11/२०25

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# ISB&M कडून पुढील पिढीच्या सप्लाय चेन ट्रेंड्सची झलक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे, : आंतरराष्ट्रीय स्कूल ऑफ बिझनेस अँन्ड मीडिया (ISB&M), पुणे येथे विद्यार्थी-चालित स्कोप क्लब (सप्लाय चेन आणि ऑपरेशन्स विद्यार्थी प्रतिनिधी मंडळ) यांच्या वतीने संस्थेचे संस्थापक–अध्यक्ष डॉ. प्रमोद कुमार आणि लॉजिस्टिक व सप्लाय चेन ऑपरेशन मॅनेजमेंट विभाग प्रमुख व फॅकल्टी कोऑर्डिनेटर श्री. नविन वर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली चेन अक्ट 2025 (Chain Act 2025) हे दोन दिवसीय प्रमुख आयोजन 28 व 29 नोव्हेंबर रोजी पार पडले.**




स्मार्ट सप्लाय चेन (“SMART Supply Chain”) या विषयावर आधारित या कार्यक्रमात जागतिक सप्लाय चेन व ऑपरेशन्स क्षेत्रातील अग्रणी तज्ज्ञ, प्राध्यापक आणि उद्योजक विद्यार्थी एकत्र येऊन तंत्रज्ञान, शाश्वतता, डेटा इंटेलिजन्स आणि मानवी कौशल्य या माध्यमातून सप्लाय चेनच्या भविष्यात होणाऱ्या बदलांवर चर्चा केली. चर्चेदरम्यान सप्लाय चेनची वाढती धोरणात्मक भूमिका, सक्षम व लोचशील बिझनेस इकोसिस्टम घडविण्यातील त्याचे महत्त्व आणि भविष्यातील नेत्यांनी तंत्रज्ञान, सहकार्य आणि चपळता आत्मसात करण्याची गरज अधोरेखित झाली.डॉ. प्रमोद कुमार यांनी H R क्षेत्रातील बदलत्या भूमिकेवर भाष्य करताना सांगितले की,“एखाद्या विषयाची निवड करण्यामागील उद्दिष्ट, त्या विषयाचा सखोल अभ्यास, योग्य पाहुण्यांना आमंत्रित करण्यासाठीची धडपड, नियोजन, टीमवर्क आणि अंमलबजावणी—या सर्व प्रक्रियेतून विद्यार्थी आत्मविश्वास, प्रत्यक्ष अनुभव आणि कल्पना वास्तवात उतरवण्याची जिद्दआत्मसातकरतात.”कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी आयोजित कॉर्पोरेट डिनर (29 नोव्हेंबर, पुणे) मध्ये विद्यार्थ्यां आणि उद्योगातील दिग्गजांमध्ये समृद्ध चर्चा झाली. चेन अक्ट 2025 (Chain Act’25) मध्ये विद्यार्थ्यांच्या सादरीकरणांवर विशेष भर देत कल्पना, विश्लेषण आणि धोरणात्मक विचार मांडण्यासाठी मंच उपलब्ध करून देण्यात आला. तसेच जागतिक सप्लाय चेनमध्ये घडणाऱ्या वास्तव ट्रेंडवर आधारित कार्यशाळाही घेण्यात आल्या ज्यामध्ये विविध उद्योगतज्ज्ञांनी सहभाग घेतला.स्मार्ट सप्लाय चेन (“SMART Supply Chain”) या विषयाद्वारे तंत्रज्ञान-सक्षम, बुद्धिमान सप्लाय चेनच्या भविष्यातील दिशा अधोरेखित करत हा कार्यक्रम नवकल्पना, शिक्षण आणि उद्योग-अकादमीया यांच्या सहकार्याचा प्रभावी मंच ठरला.या कार्यक्रमात 350+ उपस्थित, 60 प्रतिनिधी आणि 40+ जागतिक व भारतीय बहुराष्ट्रीय कंपन्यांनी सहभाग नोंदवला. लॉजिस्टिक्स, मॅन्युफॅक्चरिंग, FMCG, कन्सल्टिंग, ऑटोमोटिव्ह आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ उपस्थित होते. प्रमुख वक्त्यांमध्ये जॉयजीत बोस, CEO & Senior Industry Leader आणि दिव्या सीतापती, डायरेक्टर – ग्लोबल सप्लाय चेन यांनी सप्लाय चेनच्या बुद्धिमान व लोचशील नेटवर्क्सवरील भविष्यातील दृष्टीकोन मांडले.कायनेटिक ग्रीनचे COO व ऑपरेशन्स डायरेक्टर श्री. सुंदरेश्वरन शिवरामकृष्णन यांनी सांगितले की,“योग्य वस्तू योग्य किंमतीत, योग्य ठिकाणी आणि योग्य वेळी पोहोचवणे ही सप्लाय चेनची कला आहे. या प्रवासातून विद्यार्थी स्पष्टपणे संवाद साधणारे, उद्दिष्टपूर्ण सहकार्य करणारे आणि बारकाईने अंमलबजावणी करणारे नेतृत्व शिकतात.”Rentokil Initial चे व्हाइस प्रेसिडेंट (प्रोक्योरमेंट व सप्लाय चेन) श्री. सुबोध नागरसेकर यांनी सांगितले की,“सप्लाय चेन म्हणजे पुरवठादारांना ग्राहकांशी जोडणारा पूल—कल्पनांना प्रत्यक्ष वस्तूंत रूपांतरित करणारी प्रक्रिया. विद्यार्थ्यांकडे ऊर्जा आणि सिद्धांतज्ञान असते, पण खऱ्या उद्योगाच्या संपर्काने ते कौशल्य विकसित होते.”Chain Act 2025 मध्ये विविध प्रतिष्ठित कंपन्यांतील तज्ज्ञांनी सहभाग घेतला. यात Rentokil Initial चे सुबोध नागरसेकर, INFOLOB चे संदीप चॅटर्जी, Kinetic Green चे सुंदरेश्वरन शिवरामकृष्णन, Koye Pharma ची अनुश्री गुप्ता, APAR Industries चे वेंकटेश्वर राव, Solar Industries India Ltd. चे अविनाश गुप्ता, Sandeepika Consulting चे संदीप भार्गव, DS Group चे महेश गुप्ता, BVC Logistics ची नितू सिंह, Kimberly-Clark चे सचिन गर्ग यांसह अनेक दिग्गज व्यक्तिमत्त्वांचा समावेश होता.मीडिया स्पॉन्सर्स : Outlook, CargoConnectइतर प्रायोजक : All Waters, श्री बालू मांजरे, राकेश रावत, संतलाल पासवान (फर्निचर), अमूल, बालाजी, तृप्ती एंटरप्रायझेस, ओम साई एंटरप्रायझेस, मातोश्री, संध्या एंटरप्रायझेस, भवानी एंटरप्रायझेस, श्री साई डेकोरेटर्स, हलदी कॅटरिंग सर्व्हिसेस, ECRS Cabs, Black Orange, Rtek, RETC, बालाजी मार्बल & टाइल्स, वैष्णवी एअर कूल इत्यादी. यांचे योगदान HR Share 2025 यशस्वी करण्यासाठी महत्वाचे ठरले.Chain Act 2025 मधील चर्चेमध्ये स्मार्ट, सक्षम आणि भविष्यातील सप्लाय चेन घडवण्यावर भर देण्यात आला. संपूर्ण मूल्यसाखळीतील पुरवठादार सहकार्य, डेटा-आधारित निर्णयप्रक्रिया, मल्टी-मोडल ट्रान्सपोर्ट धोरण, इन्व्हेंटरी ऑप्टिमायझेशन, कररचना सुधारणा आणि तंत्रज्ञानाद्वारे प्रक्रिया उत्कृष्टता या महत्वपूर्ण मुद्द्यांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. कार्यप्रदर्शन, सहयोग, नवकल्पना आणि सतत सुधारणा हेच खरे मूल्यनिर्मितीचे घटक असल्याचा निष्कर्ष चर्चेतून समोर आला.ISB&M ही संस्था आजही जागतिक उद्योगाच्या वेगाने बदलणाऱ्या गरजांसाठी सज्ज नेतृत्व घडवण्याचे कार्य करत आहे. 46+ देशांमध्ये पसरलेल्या 12,000+ माजीविद्यार्थ्यांचे नेटवर्क विविध बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये महत्त्वाची पदे भूषवत आहे. सशक्त अभ्यासक्रम, उद्योगसंलग्न उपक्रम आणि सर्वांगीण शिक्षण पद्धतीमुळे ISB&Mचे विद्यार्थी शैक्षणिकदृष्ट्या सक्षमच नव्हे तर उद्योगसज्ज, नाविन्यपूर्ण आणि वास्तवातील व्यवसायातील आव्हानांना समर्थपणे सामोरे जाणारे ठरतात.Chain Act 2025 सारखी आयोजने अकादमी आणि उद्योग यांच्या सहकार्याचे उत्तम उदाहरण बनून नेतृत्व व संधी यांना एकत्र आणणारे व्यासपीठ तयार करतात.

# वाहनचोरी करणारी टोळी अटकेत

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी : पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या परिमंडळ एक मधील वाहन चोरी विरोधी विशेष पथकाने वाहनचोरी करणाऱ्या सराईत टोळीचा पर्दाफाश केला आहे. १५ लाख रुपये किंमतीच्या ३७ दुचाकी आणि दोन ऑटो रिक्षा जप्त करण्यात आल्या.मुबीन नुरमुहम्मद शेख (वय २५, रा. पिंपळेगुरव), फैज फिरोज शेख (वय २२, रा. धुळे), अमन प्रेमचंद्र शुक्ला (वय १९, रा. संत तुकारामनगर, पिंपरी), सुनील शांताराम मोरे (वय ३०, रा. उरळी कांचन) आणि राजू शंकर मराठे (वय ४६, रा. देहूरोड) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. यात दोन अल्पवयीन मुलांचाही सहभाग उघड झाला आहे.पिंपरी-चिंचवड शहरातील मेट्रो स्थानक आणि गर्दीच्या भागात वाढणाऱ्या वाहनचोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलीस आयुक्त विनयकुमार यांनी विशेष पथक तयार करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार सहायक पोलीस निरीक्षक दिगंबर अतिग्रे यांच्या नेतृत्वाखाली पथक तयार करण्यात आले. पथकाने चोरीच्या घटनांमधील १०० ते १५० ‘सीसीटीव्ही’ कॅमेऱ्यांचे चित्रीकरण तपासले. तांत्रिक तपासणी आणि गुप्त माहितीच्या आधारे आरोपींचा मागोवा घेत दुचाकी चोरी करणाऱ्या टोळीला अटक केल्याचे पोलीस उपायुक्त संदीप आटोळे यांनी सांगितले.या कारवाईदरम्यान पोलिसांनी ३७ दुचाकी, दोन ऑटो रिक्षा असा एकूण १५ लाखांचा मुद्देमाल ताब्यात घेतला आहे. पोलीस आयुक्तांलय आणि आयुक्तालयाबाहेरील वाहनचोरीचे ३४ गुन्हे उघडकीस आले आहेत. ही कामगिरी सहायक पोलीस निरीक्षक दिगंबर अतिग्रे, पोलीस उपनिरीक्षक विनायक पाटील, पोलीस हवालदार बेंदरकर यांच्या पथकाने केली.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

रविवार दिनांक 30/11/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# मावळातील दळणवळण होणार सुलभ; उद्योग, पर्यटनाला चालना

## मळवली, कान्हे रेल्वे स्थानकांजवळील उड्डाणपुलाच्या कामाचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते भूमिपूजन



»»» दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मावळ - मावळ लोकसभा मतदारसंघातील शहरी, ग्रामीण भागात विस्तारलेल्या मावळ विधानसभा मतदारसंघात रस्त्यांसह रेल्वेमार्गावर भुयारी पूल, उड्डाणपुलाची कामे प्रगतीपथावर आहेत. मळवली आणि कान्हे रेल्वे स्थानक उभारण्यात येणाऱ्या पुलामुळे टाकवे एमआयडीसी, भाजे लेणी, लोहगड, विसापूर किल्ल्याकडे जाणे सोपे होणार आहे. यामुळे उद्योग, पर्यटनाला चालना मिळेल असा विश्वास शिवसेनेचे खासदार श्रीरंग बारणे व्यक्त केला. मळवली आणि कान्हे रेल्वे स्थानक क्रॉसिंगवरील वाहतूक कोंडी सुटणार असल्याने स्थानिकांना मोठा दिलासा मिळेल, असेही ते म्हणाले.**

खासदार श्रीरंग बारणे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याने मळवली आणि कान्हे रेल्वे स्थानक क्रॉसिंगवर उड्डाणपूल उभारण्यास रेल्वेने मान्यता दिली. या दोन्ही पुलाच्या कामाचे भूमिपूजन खासदार बारणे यांच्या हस्ते शनिवारी करण्यात आले. त्यावेळी बारणे बोलत होते. यावेळी आरपीआय पक्षाचे नेते सूर्यकांत वाघमारे, शिवसेना जिल्हाप्रमुख राजाभाऊ खांडभोर, भाजपा महिला जिल्हाअध्यक्ष सायली बोत्रे, भाजपा प्रदेश सचिव जितेंद्र बोत्रे, शिवसेना जिल्हा संघटक अंकुश देशमुख, शिवसेना उप जिल्हाप्रमुख शरदराव हुलावळे, युवासेना उपजिल्हा प्रमुख दत्ता केदारी, शिवसेना मावळ तालुकाप्रमुख राम सावंत, आरपीआय पक्षाचे मावळ तालुका अध्यक्ष लक्ष्मण भालेराव, शिवसेना महिला मावळ तालुका प्रमुख शुभांगी काळंगे, एकवीरा देवी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष दिपक हुलावळे, माजी जिल्हा परिषद सदस्य गणेश धणिवले, युवासेना मावळ लोकसभा अध्यक्ष विशाल हुलावळे, शिवसेना मावळ उपतालुका प्रमुख अमित कुंभार, देहूगाव शहरप्रमुख सुनिल हगवणे, मळवली ग्रामपंचायत सरपंच गणेश तिकोने, दिलीप महाराज खंगणे, सागर हुलावळे, बाळासाहेब आंबेकर, मुन्ना मोरे, नवनाथ हरपुडे, मदन शेडगे, नितीन देशमुख बाळासाहेब भानूजगरे, सहादु बडेकर, खंडू शेलार व मोठ्या संखेने ग्रामस्थ उपस्थित होते. खासदार बारणे म्हणाले, मावळ लोकसभा मतदारसंघात २१ भुयारी मार्गाला मंजुरी मिळाली आहे. त्यात मावळ विधानसभा मतदारसंघातील तळेगाव, शेलारवाडी, कार्ला, जांभूळ येथील भुयारी मार्गाचा समावेश आहे. लोणावळा, वडगाव केशवनगर येथील उड्डाणपुलाचे काम प्रगतीपथावर आहे. लवकरच काम पूर्ण होईल. कान्हे रेल्वे स्थानक क्रॉसिंगवरील पुलामुळे नागरिकांची घरे जात होती. त्यामुळे पुलाचा मार्ग बदलला. त्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. हा पूल आंदर मावळला जोडणारा मोठा दुवा ठरणार आहे. टाकवे, जांभळू एमआडीसी भागाला हा उड्डाणपुल जोडणार आहे. याचा एमआडीसीला मोठा फायदा होणार असून उद्योगाला चालना मिळेल. मळवली उड्डाणपूल व्यावसायिकांची दुकाने, नागरिकांच्या घरांवरून जात होता. नागरिकांच्या सूचनेनुसार अपेक्षित बदल करण्यात आला आहे. हा उड्डाणपूल मळवली परिसरातील भाजे लेणी, लोहगड, विसापूर किल्ला, देवळे आणि कालाखुर्सी या गावांना जोडणारा महत्त्वाचा दुवा ठरणार आहे. पुढे पाटणपर्यंत पूल जातो. त्यामुळे पर्यटनाला चालना मिळेल. नागरिकांची वाहतूक कोंडीतून सुटका होईल, असा विश्वास खासदार बारणे यांनी व्यक्त केला.

### रेल्वे स्थानकांचा कायापालट

अमृत भारत योजनेअंतर्गत मावळ लोकसभा मतदारसंघातील चिंचवड, आकुर्डी, देहूरोड, तळेगाव दाभाडे, लोणावळा आणि पनवेल रेल्वे स्थानकांचा समावेश करण्यात आला आहे. या अंतर्गत रेल्वे स्थानकांचा कायापालट करण्यात आला आहे. रेल्वे प्रवाशांना दर्जेदार सुविधा मिळत असल्याचेही बारणे यांनी सांगितले.

### पुणे-लोणावळा रेल्वेची तिसरी-चौथी मार्गिका लवकरच

पुणे ते लोणावळा दरम्यान उपनगरीय रेल्वेच्या तिसऱ्या व



चौथ्या मार्गिकेसाठी सातत्याने पाठपुरावा सुरू आहे.

या प्रकल्पासाठी राज्य शासनाच्या आर्थिक सहभागाला राज्य मंत्रिमंडळ बैठकीत नुकतीच मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पाचा खर्च अंदाजित पाच हजार १०० कोटी रुपयांचा असून पाच वर्षांत प्रकल्प पूर्ण होईल. या प्रकल्पाचे काम लवकरात लवकर सुरू करावे यासाठी केंद्र, राज्य शासनाकडे पाठपुरावा सुरू असल्याचेही खासदार बारणे यांनी सांगितले.

### मळवली आणि कान्हे उड्डाणपूल

मळवली उड्डाणपुलात एकूण ३२ फाउंडेशन्स असून त्यात ३ अबूटमेंट्स आणि २९ पिअर्स समाविष्ट आहेत. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ६४ मीटरचा १ मुख्य गर्डर (रेल्वे ट्रॅकवर) आणि १५ मीटर लांबीचे ३० गर्डर्स रस्त्यासाठी बसविण्यात येणार आहेत. उड्डाणपुलावर १२ मीटर (४० फूट) एकूण रस्त्याची रुंदी आहे. संपूर्ण उड्डाणपुलाची एकूण लांबी ६०० मीटर आहे. यासाठी अंदाजित ५३ कोटी रुपयांचा खर्च येणार आहे.

कान्हे उड्डाणपुलात एकूण ५ फाउंडेशन्स असून त्यात २ अबूटमेंट्स आणि ३ पिअर्स समाविष्ट आहेत. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ३६ मीटरचा १ मुख्य गर्डर. १८ मीटर लांबीचे २ गर्डर्स आणि १२ मीटरचा १ गर्डर रेल्वे ट्रॅकवरून जाणाऱ्या रस्त्यासाठी बसविण्यात येणार आहेत. उड्डाणपुलावर १२ मीटर (४० फूट) एकूण रस्त्याची रुंदी आहे. उड्डाणपुलाची एकूण लांबी ४७० मीटर आहे.

त्यासाठी अंदाजित ४३ कोटी रुपयांचा खर्च येणार आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968

सस्नेह निमंत्रण

METRO CITY ICON AWARD 2025

वर्ष तिसरे

# मेट्रो सिटी
## आयकॉन अवॉर्ड २०२५

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत वर्धापन दिन निमित्त

# पुरस्कार सोहळा २०२५

### शुभहस्ते

**मा.श्री.श्रीरंग आप्पा बारणे**
मावळ लोकसभा खासदार

**मा.रोहिणी ताई खडसे**
महिला प्रदेशाध्यक्ष : राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष

### प्रमुख उपस्तिथी

**मा.श्री.इरफानभाई सय्यद**
शिवसेना उपनेते

**मा.शैलाजा ताई मोरे**
मा.उपमहापौरपि.चिं.मनपा

**मा.प्रियांका ताई बारसे**
मा.नगरसेविका पि.चिं.मनपा

**मा.सरिता ताई साने**
संघटिका : पिं.चिं.शहर शिवसेना

**मा.श्री.संतोष बारणे**
प्रसिद्ध उद्योजक, पिंपरी चिंचवड

**मा.श्री.पैगंबर शेख**
सामाजिक कार्यकर्ते

दिनांक 07 डिसेंबर 2025 | वेळ सकाळी 11:00 वा.

स्थळ : ग.दि. माडगूळकर नाट्यगृह (मिनी ऑडिटेरियम) आकुर्डी पिं.चिं.शहर

आयोजक

## शबनम न्यूज मिडिया ग्रुप

शबनम न्यूज | दैनिक मेट्रोसिटी वृत्तांत | सिटीझन मीडिया | सनशाईन ग्राफिक्स